Asst. [...] m - 2007

CODE [...] I

0007[...]

StudentBounty.com

## प्रश्नपत्रिका क्रमांक १

## [मराठी व प्रशासनिक लेखन]

वेळ : ३ तास ] [ कमाल गुण : १००

**सूचना —** (१) सर्व प्रश्न **आवश्यक** आहेत.

(२) प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

(३) *उमेदवाराने परीक्षा-क्रमांक, आपल्या स्वत:च्या नावासह कोणतेही नाव, स्वाक्षरी, पत्ता अथवा त्याची ओळख दर्शविणारे कोणते ही चिन्ह/लिखाण उत्तर पुस्तिकेत करू नये, तसे केल्यास तो शिक्षेस पात्र ठरेल.*

गुण

१. **परिशिष्ट 'अ'** मधील उताऱ्याचा गोषवारा सुमारे १५० शब्दांत लिहा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. १५

२. **परिशिष्ट 'ब'** मधील उताऱ्याचा गोषवारा सुमारे १५० शब्दांत लिहा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. १५

३. **परिशिष्ट 'क'** मधील इंग्रजी उताऱ्याचे सुबोध मराठीत भाषांतर करा. १०

४. खालील चारांपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे २५० शब्दांचा निबंध लिहा :— २०

(१) शेतकऱ्यांच्या आत्महत्या - कारणे व उपाय

(२) नेताजी सुभाषचंद्र बोस - एक झुंजार क्रांतिनायक

(३) मी राज्य निवडणूक आयोगाचा आयुक्त झालो तर!

(४) आम्ही देशासाठी काय करु शकतो ?

५. **परिशिष्ट 'ड'** मधील पत्रा आधारे गुणवत्तापूर्ण कार्यालयीन टिपणी तयार करा. १०

६. **परिशिष्ट 'इ'** मधील टिपणीतील आदेशान्वये खालील प्रकारचे पत्रलेखन करा :—

(अ) टिपणीतील विषयाचे संदर्भात मंत्रालयातील सर्व विभागांना सुचना व माहिती देण्यासाठी शासन निर्णयाचा मसुदा तयार करा. ५

(ब) पत्रलेखनाचा योग्य तो नमुना वापरून आदेश कर्मचाऱ्याला कळवा. ५

७. **(अ)** कंसातील वाक्यप्रचारांचा बिनचूक उपयोग करून दिलेली वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही **पाच**) ५

(एरंडाचे गुऱ्हाळ, चतुर्भुज होणे, सळो की पळो करून सोडणे, हातावर तुरी देणे, राम नसणे, वारी करणे, हृदय पिळवटणे)

(१) २६ जुलै २००५ च्या महापूरात अनेकांची घरे वाहून गेलेली पाहताना अतोनात दु:ख झाले.

(२) गेली चार वर्षे तो एस्.एस्.सी. नापास होत आहे.

[ उलटून पहा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

(३) त्याच्या म्हणण्यात काहीही अर्थ नाही.

(४) कैद्यांनी तुरुंगाधिकाऱ्याला फसवून तुरुंगातून पलायन केले.

(५) छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर सुध्दा मराठ्यांनी गनिमी काव्याने लढून मोगलांना खूप त्रास दिला.

(६) पोलिसांनी गुन्हेगाराला ताबडतोब कैद केले.

(७) त्या नेत्याचे कंटाळवाणे भाषण ऐकून मला झोप आली.

**( ब )** खालील अशुद्ध उतारा व्याकरण दृष्ट्या व शुद्ध लेखन नियमानुसार शुद्ध करून लिहा. ५

एकदा एका जंगलात एक चंडोल पक्षी गात होता. एक माणूस अळयांनी भरलेला डबा घेऊन आला. चंडोल पक्षाने त्याला विचारलं तू कुठं चालला आहेस. तुझ्या डब्यात काय आहे. त्या शेत कऱ्याने उत्तर दिलं, डब्यात अळया आहेत आणि त्या घेऊन मि बाजारात चाललो आहे. बाजारात अळया देऊन पिसं घेणार आहे. चंडोल म्हणाला माझ्या जवळ खूप पिसं आहेत, मी एक पीस काढून तुला देईन म्हणजे मला अळया शोधाव्या लागणार नाहीत. शेतकऱ्याने चंडोल पक्षाला अळया दिल्या. आणि त्या बदल्यात पक्षाने त्याला आपले एक पीस उपटून दिलं. दुसऱ्या दीवसी तसच घडलं. दिवसामागून दिवस तसच घडत गेलं आणि शेवटी चंडोल पक्षाच्या शरीरावर एकही पीस राहिलं नाही - आता त्याला उडताही येत नव्हतं आणि अळ्याही शोधता येत नव्हत्या. तो कूरुप दिसू लागला, त्याच गाणं थांबलं आणि लवकरच तो मरून गेला.

चंडोल पक्षाला अन्न मिळवायचा जो मार्ग सोपा वाटला होता, तो प्रत्यक्षात खडतर मार्ग निघाला. आपल्या आयुष्यातही असंच घडत, पुष्कळ वेळा आपण सोप्या मार्गाच्या सहज साध्याच्या शोधात असतो पण वास्तवात तोच मार्ग कठीण निघतो.

८. **( अ )** खालील शब्दांच्या जाती कंसात नमूद केल्याप्रमाणे लिहा. (पाचपैकी कोणतेही **तीन**) ३

(१) पोपट आंब्याच्या झाडावर बसला. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

(२) तो आणि मी बसने पुण्यास गेलो. (उभयान्वयी अव्यय ओळखा)

(३) तो रोज देवाची पुजा करतो. (सर्वनाम ओळखा)

(४) <u>अबब</u> ! किती उंच मनोरा हा ! (अधोरेखित शब्दांची जात ओळखा)

(५) सुज्ञास अधिक सांगणे नलगे. (अनियमित क्रियापद ओळखा)

**( ब )** खालील शब्दांची कंसात सांगितल्या प्रमाणे रूपे लिहा. (तीनापैकी कोणतेही **दोन**) २

(१) त्याने लाडू खाल्ला आहे. (वाक्य पुर्ण भविष्यकाळात लिहा)

(२) मी आज सातारी कंदीपेढा खाल्ला. (विशेषण ओळखा)

(३) विजा चमकू लागल्या. पावसाला सुरुवात झाली. (संयुक्त वाक्य बनवा)

www.StudentBounty.com

StudentBounty.com

१. **( अ )** खालील शब्दांची शब्दसिद्धीच्या दृष्टीने फोड करून त्यांचा अचूक अर्थ लिहा.
(पाचापैकी कोणतेही **तीन**)

(१) चाक

(२) पिता

(३) झाड

(४) भाकरी

(५) बटाटा

**( ब )** खालील इंग्रजी पारिभाषिक शब्दांचे मराठी प्रतिशब्द लिहा. (तीनापैकी कोणतेही **दोन**) २

(१) Drawing and Disbursing Officer.

(२) Vice versa.

(३) Commuted Leave.

## परिशिष्ट 'अ'

ज्याक्षणी स्त्री पूर्णपणे स्वतंत्र होईल त्या क्षणापासून ती तुमचं आयुष्य फक्त शांतीपूर्ण करेल असं नाही तर ते आनंददायी बनवेल तसंच तुम्हाला शांत बनवेल, दडपणं कमी करेल... हा अनुभव तसा तर तुम्ही रोज घेताच. जेव्हा दोन माणसं भांडत असताना जर एखाद्या स्त्रीचं तिथे आगमन झालं तर ते लगेच गप्प बसतात. एखाद्या सभ्य माणसासारखे शांत होतात... ती स्त्री तिथे येण्यापूर्वी वाईट वाईट शिव्या ते देत असतात पण ती आल्यानंतर त्यांची भाषा बदलते...

सध्या अमेरिकेमध्ये काही तुरुंगामध्ये प्रयोगतत्त्वावर स्त्री आणि पुरूष कैद्यांना एकत्र ठेवण्याचे प्रयोग केले जात आहेत. आत्तापर्यंत त्यांचे तुरुंग वेगवेगळे होते. काही दिवसांनी असं निदर्शनाला आलं की या एकत्रित तुरुंगामुळे जास्त धोकादायक पुरुष कैदीसुद्धा शांतपणे वागत आहेत... सभ्यपणानं आचरण करत आहेत... केवळ स्त्रियांच्या सान्निध्यामुळे! तुरूंगाचे मानसोपचार तज्ञसुद्धा चकित झाले. अतिशय खतरनाक खुनी, बलात्कार करणारे गुन्हेगार; पण ते सुद्धा सुतासारखे सरळ वागायला लागले. रोज दाढी करायला लागले, आंघोळी करायला लागले. यूडीकोलन, आरसे, कंगवे यांची मागणी करायला लागले... त्यांची संपूर्ण वागणूकच बदलून गेली. त्यापूर्वी त्यांच्या एकमेकात सतत भांडण मारामाऱ्या चालायच्या. केवळ स्त्रियांच्या येण्यामुळे तिथलं संपूर्ण वातावरणच बदलून गेलं. तुरुंगामध्ये प्रणयाला प्रतिबंध असतो. तरीही बायका आल्यानंतर तिथे अतिप्रसंग घडण्याची बरीच शक्यता होती... परंतु तसं घडलं नाही. उलट सर्व बाजूंनी त्यांच्यावर नजर ठेवली जात असल्यानं सतत दडपणाखाली वावरावं लागतं याबद्दल त्यांची तक्रार होती.

[ उलटून पहा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

जेलमध्ये सगळे अधिकारी, प्रत्येक खिडकीतून, दारामधून, प्रत्येक झरोक्यातून या कैद्यांवर नजर ठेवायचे. स्त्रियांवर कोणताही अतिप्रसंग येऊ नये हा त्यामागचा उद्देश होता... परंतु कैद्यांचे म्हणणं असं...''सतत आमच्यावर अशी पाळत ठेवल्यामुळे आमचा अपमान होतो. आम्ही गुन्हेगार असलो तरीही माणूस आहोत. कारण आम्ही कोणीही स्त्रियांचा गैरफायदा घेत नाही. संपूर्ण रात्र अशाप्रकारे आमच्यावर पाळत ठेवणं हे अतिशय लाजिरवाणं वाटतं. आम्ही त्यामुळे झोपूही शकत नाही.'' एवढी एक तक्रार सोडल्यास ते तसे आनंदी होते. स्त्री कैद्यांनीही कधी त्रास दिला नाही. तापलेलं वातावरण हळूहळू शांत झाले...

सर्व जगभरातून स्त्रियांना जर स्वातंत्र्य दिलं गेलं तर माझी खात्री आहे की त्यातल्या बऱ्याचशा स्त्रिया आत्मसाक्षात्कारी बनतील, योगी बनतील, महान कवी बनतील, चित्रकार बनतील, त्या स्वत:चाच विकास करून घेतील असं नाही तर संपूर्ण जगाच्या विकासाला त्या हातभार लावतील. पुरूषांनासुद्धा त्या पद्धतीनं विकासाला मदत करतील. कारण त्यांची कोणत्याही गोष्टीकडे पाहाण्याची दृष्टी निराळी असणार आहे.

स्त्रीला स्वातंत्र्य देण्यात, तिला समान संधी देण्यात, त्यांचं स्वत्व बहाल करण्यात स्त्री आणि पुरुष दोघांचाही फायदा आहे. असं झालं तरच स्त्रीला विनोदबुद्धी लाभू शकेल. पुरुषांपेक्षा ती जास्त चांगल्या तऱ्हेनं हसू शकेल... तसं तर पुरूषांपेक्षा चांगली विनोदबुद्धी असण्याइतके सुप्त गुण तिच्या अंगामध्ये आहेत... परंतु ते दडपले गेले आहेत. आत्तापर्यंतच तिचं जीवन इतकं हालअपेष्टांचं गेलेलं आहे की हास्यविनोदाची कल्पना तिच्या बाबतीत करण्याचं आपण विसरून गेलो आहोत. परंतु आता स्त्रीचे दिवस दूर नाहीत. आता हास्यानं जग भरून जाणार आहे. युद्धाच्या गप्पांऐवजी, मंत्र्यांच्या भाषणांऐवजी, काहीही न समजता मूर्खासारखी प्रवचनं देणाऱ्या प्रवचनकारांऐवजी जीवनात हास्य-विनोद आणि आनंदी दृष्टीनं पाहिल्यास फारच बरं होईल नाही का?

एकदा एक सद्‌गृहस्थ ऑफीसमधून बाहेर पडला. रस्त्यात त्याला काय वाटलं कुणास ठाऊक पण वाटेत एक फुलांचा गुच्छ त्यानं खरेदी केला. घरी आल्यानंतर बायकोला आश्चर्यचकित करावं या उद्देशानं त्यानं दारावरची घंटी वाजवली आणि तो लपून बसला. बायकोनं दार उघडल्यानंतर उडीमारून तो तिच्यासमोर आला आणि तिला फुलांचा गुच्छ भेट दिला.

बायको इतकी दचकली की रागानं रडायलाच लागली... म्हणाली, ''हे काय हे? सकाळीच माझ्या हातून किटली फुटली, दिवसभर बाळ रडत होतं... आणि त्यातून आता तुम्ही हे असे पिऊन आला आहात.''

त्यानं फुलं आणणं हे पहिल्यांदाच घडलेलं असावं म्हणून तिला धक्का बसला असावा. ती बिचारी बायको हसू कशी शकणार? त्या सद्‌गृहस्थाचं हसणंसुद्धा गोठून गेलं, कारण हे असं स्वागत पाहून तो चकित झाला.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

## परिशिष्ट 'ब'

मन म्हणजे दुसरं तिसरं काही नसून ते म्हणजे फक्त एक स्मरणसाखळी! एक स्मृती! आणि 'स्मृती' म्हणजे 'जागरूकता' नव्हे... तुझ्याबाबतीत हाच उलगडा पहिल्या प्रथम व्हायला हवा... स्मृती ही संपूर्ण वेगळी प्रक्रिया आहे. एखाद्या मूर्ख माणसाजवळ सुद्धा काहीवेळा विलक्षण स्मरणशक्ति असते. बुद्धिमत्ता हा संपूर्णपणे वेगळा प्रकार आहे. एवढंच काय परंतु खूप बुद्धिमान माणसं बऱ्याचवेळा विसरभोळीच असतात. त्यांची संपूर्ण मानसिक शक्ति ही बुद्धिमत्तेकडे खेचली गेलेली असते. परंतु त्यांच्या 'स्मृती' ला फारसं पोषण मिळत नसतं. जो माणूस बुद्धिमान नसतो त्याची सगळी शक्ति ही 'स्मृती' साठी वापरली जाते. असे असंख्य प्रकार आपल्याला आढळतात की एखादा अत्यंत मूर्ख मनुष्य 'स्मृती' चे लोकविलक्षण चमत्कार दाखवत असतो.

लॉर्ड कर्झनच्या काळामध्ये हे असं घडलेलं आहे. कर्झनच्या काळातील घटना ही खरोखरची वेगळी घटना म्हणायला हरकत नाही. कारण अशा तऱ्हेची एखाद्या खेडूत माणसाची अवघड परिक्षा कधीच घेतली गेली नव्हती... हा खेडूत मुळीच बुद्धिमान नव्हता... ही घटना तशी फार जुनी नाही. कारण कर्झन हा आपल्याला माहितीचा गव्हर्नर जनरल या घटनेचा तपशील न तपशील लिखित स्वरूपात उपलब्ध आहे –

लॉर्ड कर्झनने या माणसाविषयी बरंच ऐकलेलं होतं... त्या माणसाची स्मरणशक्ती इतकी अफाट होती की कुणाचाही विश्वास बसणार नाही... कर्झनला चैन पडेना. त्यानं त्याला बोलावून घेतलं त्या खेडूताला फक्त मातृभाषाच अवगत होती. ती म्हणजे राजस्थानी. हिंदीला जवळची भाषा! काहीही शिक्षण नाही, दुसऱ्या कोणत्याही भाषांचं ज्ञान नाही, असा तो अशिक्षित खेडूत होता. कर्झन हा अत्यंत कपटी राजकारणी होता. त्या खेडूत माणसाची परिक्षा घेण्यासाठी कर्झननं इतक्या धूर्तपणानं आखणी केली की तो मनुष्य त्यात नापासच व्हावा.

व्यवस्था अशी-तीस माणसं त्यानं सभेमधे बोलावली ही तीस माणसं वेगवेगळया भाषांमधली होती... परिक्षा घेण्याची प्रक्रिया अशी... तीसपैकी प्रत्येक माणसानं स्वत:च्या भाषेमध्ये एक शब्द बोलायचा. त्या खेडूतानं सुरूवातीला पहिल्या माणसाजवळ जायचं, त्यानं त्याच्या वाक्यातला एक शब्द उच्चारायचा. त्यानंतर त्याक्षणी एका मोठ्या घंटेचा एक टोला दिला जायचा.. का तर त्या खेडूताचं चित्त विचलित व्हावं हा उद्देश. त्यानंतर त्या खेडूतानं दुसऱ्या माणसाजवळ जायचं. त्या माणसानं एक शब्द उच्चारायचा... नंतर एक घंटेचा टोल वाजे... नंतर तिसऱ्याकडे... जायचे... असं तीस माणसांकडे जाऊन त्यांनी उच्चारलेले एकेक शब्द ऐकायचे... त्यानंतर दुसऱ्या फेरीत तीस माणसांनी उच्चारलेला दुसरा शब्द... तिसऱ्या फेरीत

[ उलटून पहा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

तिसरा शब्द. अशा तऱ्हेने प्रत्येक भाषेतलं एक संपूर्ण वाक्य... अशी तीस भाषातली तीस वाक्य असंख्य फेऱ्यांमध्ये ऐकायची त्यातच घंटेचे टोल वाजवणं... खरोखर अत्यंत क्रूरतेनं ही परिक्षा घेण चाललेलं होतं. परंतु अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी की त्या खेडूतानं म्हणे तीसही वाक्य जशीच्या तशी (निरनिराळ्या भाषांमधली) म्हणून दाखवली... खरोखरच हे सगळं अद्‌भुतच म्हणायला पाहिजे...

लॉर्ड कर्झननं आपल्या आत्मचरित्रात या घटनेचा उल्लेख केलाय. त्यानं लिहिलंय. ''माझ्या डोळ्यानी ही घटना मी प्रत्यक्ष पाहिलीय. मीच ती सारी व्यवस्था केली होती. अजूनही काहीवेळा मला प्रश्न पडतो की हे खरंच घडून गेलेय का? एवढी तीव्र स्मरणशक्ती एखाद्याजवळ असणं शक्य आहे का? – आणि हा माणूस तर खरोखरच एक मूर्ख खेडूत होता.'' सगळ्या गावातले लोक त्याला एक साधा भला माणूस समजत होते. बुद्धी वापरून एक ही गोष्ट त्यानं आतापर्यंत केली नव्हती. परंतु ही अशी स्मरणशक्ती मला वाटतं एखाद्या कॉम्प्युटरप्रमाणे निसर्गानं एखाद्यालाच बहाल केली असावी–

## परिशिष्ट 'क'

The Indian Renaissance began in Bengal. It was initiated by Raja Ram Mohan Roy. He was a staunch advocate of the principles of individualism, democracy, liberty and equality. He strongly opposed the evil social customs and traditions like casteism. He was convinced that the country would not progress unless the society was reformed. To carry his thoughts to the people, he started two newspapers, namely, 'Samvad Kaumudi' and 'Mirat-ul-Akhbar'. He strove for the spread of western education. He laid the foundation of an all round reform movement in India. Hence, he is rightly called the father of Modern India.

Like Raja Ram Mohan Roy, a number of social reformers dedicated themselves to this work of social reform. Their attention was mainly drawn to the miserable condition of the depressed classes and women. They realized that upliftment of Indian society was not possible unless the condition of these classes was improved. Hence, they devoted themselves to this task and set up a number of public institutions for this purpose.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**परिशिष्ट 'ड'**

श्री. अ ब क
जय जवान कॉलनी
शास्त्री नगर, गडचिरोली
दि. २०.१०.०७

प्रति,
मा. प्रधान सचिव
सा.न्या.व.वि.स. विभाग
मंत्रालय, मुंबई - ३२

विषय :— मागास वर्ग उमेदवाराच्या जाती प्रमाण पत्राची तपासणी करण्याबाबत.

महोदय,

मा. सर्वोच्च न्यायालयाने कुमारी माधुरी पाटील विरुद्ध अप्पर आयुक्त, आदिवासी विकास जि. ठाणे व इतर या प्रकरणी दि. २.७.१९९४ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्र/दाव्याची तपासणी करून वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी राज्यामध्ये विभागीय स्तरावर विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. सदर समित्यांमार्फत शैक्षणिक, सेवाविषयक आणि निवडणूक विषयक उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येते. परंतु सदर पडताळणी अत्यंत क्लीष्ट, गुंतागुंतीची व वेळ खाणारी आहे. त्यामुळे सदर समित्यांकडे बरीचशी प्रकरणे अनेक वर्षापासून प्रलंबीत आहेत. अनेक विद्यार्थ्यांच्या, शासकीय कर्मचाऱ्यांच्या, व लोकप्रतिनिधींच्या भवितव्याबाबत प्रश्न निर्माण झालेला आहे.

माझे स्वत:चे जाती प्रमाणपत्र पडताळणी प्रकरण गेल्या चार वर्षापासून पुणे येथील समितीकडे प्रलंबीत आहे. माझ्या घरातील माझे वडील, भाऊ व बहिण यांचे जाती वैधता प्रमाणपत्र असताना सुद्धा समिती माझ्याकडे अधिक पुराव्याची व कागदपत्रांची मागणी करीत आहे. तरी आपणास विनंती की माझ्या कुटुंबातील व्यक्तींच्या जात वैधता प्रमाण पत्राच्या आधारावर मला माझे जात वैधता प्रमाणपत्र देण्यासंबंधात पुणे येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समितीस योग्य ते आदेश द्यावेत. ही विनंती,

कळावे,
आपला विश्वासू,

अ ब क

[ उलटून पहा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

## परिशिष्ट 'इ'

**( अ )** शासनाच्या संगणकीकरणाच्या धोरणानुसार विविध मंत्रालयीन विभागांचे संगणकीकरणांतर्गत माहिती तंत्रज्ञान संचालनालयातर्फे संगणक व तद्नुषंगिक उपकरणांचा पुरवठा करण्यात येतो. संगणकीकरणांतर्गत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने १९९८-९९ पासून संगणक व तद्नुषंगिक उपकरणांची खरेदी करून विविध मंत्रालयीन विभागांना त्याचा पुरवठा केला आहे. सन् १९९८-९९ मध्ये खरेदी केलेले संगणक व तद्नुषंगिक उपकरणे आता कालबाह्य झालेली आहेत. यातील संगणकाचा वेग कमी पडत आहे, त्यावर अद्यावत आज्ञावल्या स्थापित होवू शकत नाहीत, त्यांचे अद्यावतीकरण शक्य नाही, त्याचे सुटे भाग बाजारात उपलब्ध होत नाहीत. प्रिंटर्सला वारंवार दुरुस्तीची आवश्यकता भासते; त्यातील इलेक्ट्रॉनिक सुट्या भागाबरोबरच मॅकॅनिकल भागांच्या तक्रारीत वाढ झाली आहे. तसेच कालबाह्य झालेले संगणकाचे निर्लेखन व विल्हेवाट करण्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी बऱ्याच कार्यालयाकडून विचारणा होत आहे. या बाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या संगणकीकरण प्रकल्प अंमलबजावणी समिती संगणक व तद्नुषंगिक उपकरणांच्या निर्लेखन व त्यांची विल्हेवाट करणे बाबत चर्चा झालेली असून त्यांनी सदर संगणक व तद्नुषंगिक उपकरणे कार्यालयातील कर्मचारी व अधिकाऱ्यांना खाली दर्शविलेल्या सवलतीच्या दरामध्ये विक्री करण्याबाबत सुचविले आहे.

| | | | रुपये |
|---|---|---|---|
| (१) | संगणक | – | १०००/- |
| (२) | लॅप टॉप संगणक | – | ३५००/- |
| (३) | नेटवर्क प्रिंटर्स | – | ५००/- |
| (४) | डि.एम्.पी. | – | २००/- |
| (५) | पर्सनल लेझर प्रिंटर्स | – | ५००/- |

उपलब्ध उपकरणापेक्षा विभागातून जास्त मागणी प्राप्त झाल्यास लॉटरी पद्धतीने नाव निवड करण्यात यावी. संगणक व उपकरणांची खरेदी करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याने माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या रोख शाखेत रोख रकमेचा भरणा करून रक्कम भरल्याची पावती सादर केल्यावरच संगणक किंवा उपकरण त्याचे ताब्यात देण्यात येईल.

——— x ———

या सबंधात सर्व मंत्रालयीन विभागांना सुचना व माहिती देण्यासाठी शासन निर्णयाचा मसुदा तयार करा.

**( ब )** उपरोक्त टिपणीतील आशय विचारात घेवून श्री. य र ल लिपिक उच्च व तंत्र शिक्षण विभाग या कर्मचाऱ्यास संगणक खरेदी करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तरी सदर कर्मचाऱ्यास वरील आदेश कळविण्याबाबत योग्य त्या पत्राचा मसुदा तयार करा.

-o0o-

www.StudentBounty.com